८. दिवे होऊया

जयंतकुमार त्रिभुवन (१९४२-२००६) : शिक्षणतज्ज्ञ, लेखक, नाटककार, कवी, दिग्दर्शक, संगीतकार. त्यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान प्रशंसनीय आहे. त्यांची अनेक पुस्तके व लघुकथा प्रसिद्ध आहेत. अनेक नाटकांचे रेडिओवरून सादरीकरण.

दु:खी, पीडित, दुरितांच्या जीवनामध्ये आनंद येण्यासाठी आपण दिवे होऊया व त्यांना तेज-पथाचे यात्री करूया, असा संदेश प्रस्तुत कवितेत कवीने केला आहे.

दिवे उजळता, दिवे होऊया ।
जळता जळता जग उजळूया ।।

डोळे पुसुनि दु:खी जनांचे
त्या अश्रूंच्या ज्योती करूया ।
रात्र जरी अंधारी असली
अंधारा आव्हान देऊया ।।

थरथरणाऱ्या अनेक ज्योती
एक होऊनि मशाल बनूया ।
विश्वातील अवघ्या दुरितांना
तेज-पथाचे यात्री करूया ।।

निरांजनाशी सांगत नाती
अंतर-मंदिरी तेज भरूया ।
तिमिर-बंधने तोडून सारी
चराचराला प्रकाश देऊया ।।



स्वाध्याय

प्र. १. (अ) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.

(१) प्रकाशाची बंधने दूर करूया.
(२) दिवे होऊन जळूया.
(३) निरांजनाशी नाते तोडूया.
(४) अंधाराला आव्हान देऊया.

(आ) चौकटी पूर्ण करा.

(१) कवींना बनायचे आहे.
(२) दु:खितांच्या अश्रूंच्या बनवूया–
(३) थरथरणाऱ्या ज्योतींची बनूया –
(४) अंतर-मंदिरी भरूया –
(५) सर्व बंधने तोडून देऊया –

प्र. २. (अ) कवितेतील ओळी व त्यांचा अर्थ यांच्या योग्य जोड्या लावा.

'अ' गट	'ब' गट
(१) डोळे पुसुनि दु:खी जनांचे.	(अ) अंधाराला दूर करण्याचे आव्हान स्वीकारू.
(२) अंधारा आव्हान देऊया.	(ब) प्रकाशमय जीवनरस्त्याचे प्रवासी बनू.
(३) तेज-पथाचे यात्री करूया.	(क) प्रत्येकाची मने तेजाने भरवू.
(४) अंतर-मंदिरी तेज भरूया.	(ड) अंधकाराच्या आड येणारी बंधने तोडून टाकू.
(५) तिमिर-बंधने तोडून सारी.	(फ) दु:खी लोकांचे दु:ख दूर करू.

(आ) प्रश्न तयार करा.

(१) 'मशाल' उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.
(२) 'चराचराला' उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

प्र. ३. खालील शब्दांचे समानार्थी शब्द कवितेतून शोधा.

(१) अंधार –   (२) जग –
(३) दीप –   (४) रजनी –

प्र. ४. स्वमत.

(१) कवीला काय काय करावेसे वाटते? ते कवितेच्या आधारे तुमच्या शब्दांत लिहा.
(२) 'अंधार' आणि 'प्रकाश' या दोन संकल्पनांचा तुम्हांला समजलेला अर्थ सोदाहरण स्पष्ट करा.
(३) 'डोळे पुसुनि दु:खी जनांचे त्या अश्रूंच्या ज्योती करूया।' या ओळीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

प्र. ५. अभिव्यक्ती.

कवीप्रमाणे तुम्हांला कोण व्हावेसे वाटते, ते सकारण स्पष्ट करा.

✻ तक्ता पूर्ण करा.

बाजूच्या चौकटीतून शब्द किंवा शब्दसमूह योग्य ठिकाणी भरून नंतर उरलेले रकाने भरा.

अ.क्र.	सामाजिक शब्द	विग्रह	समासाचे नाव
(१)			
(२)	बरेवाईट	बरे किंवा वाईट	वैकल्पिक द्‌वंद्‌व
(३)			
(४)			
(५)			
(६)			
(७)			

घडोघडी
बरेवाईट
पाप किंवा पुण्य
प्रतिक्षण
मीठभाकरी
जन्मापासून मरेपर्यंत
दहा किंवा बारा

भाषाभ्यास

अलंकार

आपण जेव्हा कथा, कादंबरी, कविता, नाटक वगैरे साहित्य वाचतो, तेव्हा दैनंदिन जगण्यातील भाषेपेक्षा थोडी वेगळी भाषा आपल्याला वाचायला मिळते. आपल्याला साहित्य वाचताना आनंद मिळवून देण्यात त्या भाषेचा मोठा वाटा असतो. दैनंदिन व्यवहारातील भाषेपेक्षा साहित्याची भाषा ज्या घटकांमुळे वेगळी ठरते, त्यांतील एक घटक म्हणजे 'अलंकार'. अलंकार भाषेचे सौंदर्य कसे खुलवतात, हे आपल्याला काही उदाहरणे घेऊन पाहायचे आहे.

अलंकाराचे मुख्य दोन प्रकार

(१) **शब्दालंकार**
यमक, अनुप्रास आणि इतर
शब्दांतील अक्षरयोजनेमुळे नाद निर्माण होतो.

(२) **अर्थालंकार**
उपमा, उत्प्रेक्षा, रूपक आणि इतर
योजलेल्या शब्दांमुळे अर्थाचे सौंदर्य निर्माण होते.

आपण काही शब्दालंकारांचा परिचय करून घेणार आहोत.

१. अनुप्रास अलंकार

✻ खालील वाक्य वाचा.

'काकूने काकांच्या कपाटातील कामाचे कागद कात्रीने कराकरा कापले.'

हे वाक्य वाचून हसू आले ना? 'क' हा ध्वनी पुन्हा पुन्हा आल्यामुळे वाक्यात ही गंमत निर्माण झाली आहे.

✻ आता खालील ओळी वाचा.

''गडद निळे गडद निळे
जलद भरून आले.''

या ओळीत ग, ड, द, न, ळ, अशा ध्वनींची पुनरावृत्ती झाली, त्यामुळे कवितेत एक नाद निर्माण झाला. कविता वाचताना आणि ऐकताना त्यातील नादामुळे कविता ऐकण्याचा आनंद मिळतो, अशा वेळी तिथे 'अनुप्रास' अलंकार होतो.

एखाद्या वाक्यात किंवा कवितेच्या चरणात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे जेव्हा त्या वाक्याला वा कवितेला सौंदर्य प्राप्त होते, तेव्हा अनुप्रास हा अलंकार होतो.

✻ खालील ओळीत कोणत्या ध्वनींची पुनरावृत्ती झालेली आहे?

''हटातटाने पटा रंगवुनि जटा धरिसी का शिरीं?''

GCLC6F